| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन<br>जिल्हा परिषद,बीड<br>(शिक्षण विभाग,प्राथमिक)<br>ई मेल :- mdmbeed@gmail.com | |

जा.क्र. जिपबी/शिविप्रा/ /कावि No – 5113 दिनांक :- / /2025

18 SEP 2025

## नमुना दोन

ग्राम :- **जालना रोड शिदोड ता.बीड** दूरध्वनी : 8830973993 ईमेल : gpsbeed@gmail.com
व्यवस्थापक :- **सावित्रीबाई फुले महिला शिक्षण प्रसारक मंडळ,उक्कडपिंप्री ता.गेवराई जि.बीड**

**विषय:- बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रजोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2011 यांच्या नियम 11,पोटनियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्या बाबत**

मा. महोदय/महोदया,

आपला दिनांक / /2025 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्र व्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद बीड **दिनांक 01/04/2025 पासून ते दि.31/03/2028 पर्यंत** तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इ.01 ली ते 08 वी** करिता **गुरुकुल पब्लिक स्कुल,बायपास,शिदोड,जालना रोड बीड** या शाळेस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या आधीन आहे.**

1.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतीही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011 (जोडपत्र-2) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित घटकातील बालकांना पहिल्या त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणांकाचे अनुपालन करण्यात येईल.

4. परिच्छेद 3 निर्दीष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटिशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.

6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

7 (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या कोणत्याही बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग /विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या त्यांची /तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करेल.

8.शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेला अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9.शाळा अधिनियमाचे कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाचे तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाचे खालील प्रमाणे होत्या.